विषय:-१

माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर, कात्रज, पुणे-४११०४६
कार्यालयाचा संपर्क क्र. :- ०२०-२५५०८८००
ई-मेल:- kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्र.:- ०२०-२५५०८८००
जावक क्र. :- ९१३४ दिनांक:- १२/०१/२०२६

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

१. अपिलार्थी
अॅड. विशाल वि. पवार
ऑफिस क्र. १/बी,पहिला मजला,
शास्त्री कमिर्शयल कॉम्प्लेक्स,
मुकुंदनगर, पुणे-३७
संपर्क:- ९४२२५६३५५५
२. श्रीमती राखी चौधरी
जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
कोंढवा- येवलेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.

अपिलार्थी अॅड. विशाल पवार
विरुद्ध
जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता पुणे महानगरपालिका.
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपिल

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपिलार्थी अॅड. विशाल पवार यांनी दि.०९/१२/२०२५ रोजी उप अभियंता तथा जन माहिती अधिकारी महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय यांचेकडे अर्ज करून माहितीची मागणी केलेली आहे.

माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहार संबधीची माहिती.

माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील				
माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा आवक क्र.व दिनांक	माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक	अर्जदारास उत्तर पाठविल्याचा जावक क्र. व दिनांक	अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक	अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक
आ.क्र. ८७२६ दि.०९/१२/२०२५	दि.१०/०१/२०२६	जा.क्र. ७४४१ दि.१६/१२/२०२५	-	-

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण :- आपल्या कार्यालयामार्फत समाविष्ट प्रभागाच्या कार्यक्षेत्रात दि.०२/१२/२०२० पासून ते ३१/१२/२०२५ पर्यंत एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) २०२० विनियम १३.४.१ ते १३.४.६ नुसार आपल्या कार्यालयाकडे सर्व प्राप्त मैलापाणी शुध्दीकरण केंद्रा बाबत प्रकिया केलेल्या पाण्याची MPCB यांचेकडून अथवा MPCB प्रमाणित, मान्यता प्राप्त MOEF प्रयोगशाळेकडून वेळोवेळी तपासणी करून सादर केलेल्या अहवालाबाबतची सर्व कागदपत्राबाबतची माहिती अर्जदार यांना देण्यात यावी, याबाबत अर्ज दाखल केलेला असे.

प्रथम अपिल अर्जाचा तपशिल				
प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक	प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक	प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का?	प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का?	प्रथम अपिल सुनावणी सूचना पाठविल्याचा जावक क्र. व दिनांक
दि.२६/०१/२०२६	आ.क्र. ९८३६ दि.३१/१२/२०२५	होय	-	जा.क्र. ८४७२ दि.१९/०१/२०२६

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ:- ०६/०२/२०२६ रोजी दुपारी ०४.०० वाजता
सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस जन माहिती अधिकारी :- उपस्थित

विवेचन

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकार अर्जावरील सुनावणी मध्ये अपिलार्थी हे उपस्थित होते तसेच श्रीमती राखी चौधरी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता व संबंधित कनिष्ठ अभियंता उपस्थित होते. अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ६(१) अंतर्गत प्राप्त अर्जात नमूद माहितीची मागणी जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांचेकडे केली आहे. तदनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी तथा महा.सहा.आयुक्त कोंढवा येवलेवाडी यांनी संबंधित जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांचेकडे विचारणा केली असत संबंधित माहितीचा कोणताही दस्तऐवज जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांचेकडे उपलब्ध नाही तसेच संबंधित विभागास सदर अर्ज वर्ग केल्याचे जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांचे म्हणणे आहे. तरी सदर माहिती विषयी कोणतेही दस्तऐवज उपलब्ध नसल्याने माहिती निरंक आहे.

आदेश

मा.महापालिका सहाय्यक आयुक्त, कोंढवा येवलेवाडी कार्यालय यांनी आदेशित केलेनुसार जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या मूळ अर्जात विचारणा केलेनुसार सदर माहिती विषयी कोणतेही दस्तऐवज उपलब्ध नसल्याने माहिती निरंक आहे.

सबब सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(सुचिता पानसरे)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
महा.सहा.आयुक्त
कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक:-
ठिकाण:-पुणे

टीप:- १) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९ (३) अन्वये निर्णय प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या आत मा. आयुक्त राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, विधानभवन समोर पुणे-४११००१ यांचेकडे द्वितीय अपिल करता येईल.

२) या आदेशाची प्रत पुणे महानगरपालिकेच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.